# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
(दुपार)

जा.क्र. ५७९/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:–११/०९/२०१६

**१) घरातील संगणकाचे साहित्याची चोरी. :–**

दिनांक ०९/०९/२०१६ ते १०/०९/२०१६ चे १०.०० वा. दर. यातील फिर्यादी हा आपले घरी ग्राऊंड फ्लोअर मध्ये झोपले असता फिर्यादीने दुस–या माळयावर दरवाजा नसल्याने खुल्या रुम मध्ये टेबलावर ठेवलेला संगणकाचे साहित्य मॉनिटर ईन्टेक्स कंपनीचे १७ इंच, सीपीयु, युपीएस, कि–बोर्ड, मावुस असा एकुण २०,८००/–रू. चा माल कोणीतरी अज्ञात चोराने फिर्यादीचे घराचे वॉलकंपाऊन्ड वरुन चढुन पाय–यावर जावुन आत प्रवेश करुन वरिल माल चोरुन नेल्याने फिर्यादी दिपक रविशेखर मारबते वय २७ वर्ष रा.कपिल नगर भंडारा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३८० भादवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सपोनी. रायपुरे पो.स्टे.भंडारा हे करीत आहेत

**२) मारोती व्हॅनची मोटार सायकलला धडक, एक जखमी. :–**

दिंनाक १०/०९/२०१६ रोजी १०.३० वा. दर. यातील जखमी राजेन्द्र मारोती दांडेकर वय ४० वर्ष रा. गिरोला हा गावचे व्यक्तीचे मोटार सायकल वर बसुण भंडारा कडुन गिरोलाकडे जात असता साई मंदीराजवळील गॅरेज कडुन येणा–या अज्ञात आरोपी मारोती व्हॅन चालकाने आपले ताब्यातिल वाहन हयगयिने व लाफरवाहीने चालवुन जखमी बसलेल्या मोटार सायकल ला धडक मारल्याने जखमी हा खाली पडुन जखमी होण्यास कारणिभुत झाल्याने फिर्यादीचे बयाण व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २७९,३३७,भादवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गि–हेंपुजे पो. स्टे. भंडारा हे करीत आहेत

**३) विनयभंग केल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक १०/०९/२०१६ रोजी १४.३० वा. दर. यातिल फिर्यादी ही भिवसन टोला येथील राहणारी असुन आरोपी हा कृषी औषधीच्या प्रसाराकरिता गोंदीया जिल्हयातुन आला होता त्यामुळे त्याची एकमेकांनसोबत ओळख झाली त्यामुळे आरोपीने फिर्यादी सोबत फोनवर बोलने सुरु केले. फिर्यादी ही आज दवाखाण्यामध्ये आली असता आरोपीने फिर्यादीस फोन करुन तु कुठे आहेस असे विचारुण फिर्यादीने कटकवार शाळेजवळ नागझिरा रोडवर आहे. असे सांगितले असता आरोपी हा त्या ठिकाणी येवुन फिर्यादीस आरोपीने कुठे व कोणत्या जंगलात जावुन असे बोलुन तिचा उजवा हात पकडुन विनयभंग केल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३५४ (अ) भादंवी. अन्वये गुन्हो नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनी वानखेडे पो.स्टे.साकोली हे करीत आहेत.

**४) मंदिरातील मातेच्या मुर्तिचे डोके चोरी. :–**

दिंनाक. १५/७/२०१६ ते ८/९/२०१६ रोजी १७.०० वा. दर. यातिल कोणीतरी अज्ञात आरोपीने माता माईचे मंदिरातील ३ मातेच्या मुर्तिचे डोके कापुन धार्मिक भावणा दुखावल्याने फिर्यादी अजाबराव सुकलाल गराडे वय ४५ वर्ष रा.माडेसर यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पो.स्टे. मोहाडी येथे कलम २९५ भादंवी. चा गुन्हा नोंद करण्यात आला.पुढील तपास सपोनी चौधरी पो.स्टे. मोहाडी हे करित आहेत.

**५) ट्रकची एस.टी. बसला धडक . :—**

दिंनाक ९/९/१६ रोजीचे २१.२० वा. दर. यातिल आरोपी चालकाने आपले ताब्यातिल ट्रक क्र.एमएच. १३ जी ५८९० हा लाफरवाहीने व निष्काळजी पणाने चालवुन एस.टी.बस क्रं.एम.एच ४०/एन ८९८४ ला ड्रायव्हर साईडला डॅश मारुण अपघात करुन एस.टी.बस चे समोरील ग्लॅास व साईड ग्लॅास फुटुन अंदाजे १०,०००/—रु चे नुकरान झाल्याने फिर्यादी विनोद आंनदराव नेगवाडे वय ४२ वर्ष रा. सिंदपुरी पवनी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पो.स्टे. अडयाळ येथे कलम २७९,४२७ भादवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला पुढील तपास पो.हवा. सतदेवे पो.स्टे. अडयाळ हे करित आहे.

प्रभारी पोलीस अधिकारी
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ९९२१७४१६१९

**प्रति,**

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.